सत्याच्या मार्गावर चालणारे नेहमी विजय ि मळवतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ८ एप्रिल २०२५ | अंक ११७ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु








# सरकारने आखलेल्या चुकीच्या धोरणांचे सामान्य माणसावर ओझे

## जयंत पाटलांची टीका



### सामान्य माणसाचे कंबरडे मोडले जात आहे

आज सकाळीच शेअर मार्केट गडगडले आणि सामान्य मध्यमवर्गीय माणसाला त्याचा धक्का बसला. या धक्क्यातून सावरत नाही तोच आज केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवर प्रति लिटर २ रुपये एक्साईज ड्युटी वाढवली आहे. त्यामुळे पेट्रोल डिझेलही महाग होणार आहे. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीतही ५० रुपयांची वाढ झाली आहे. उद्यापासून नवीन किमती लागू होणार आहे. सरकारने आखलेल्या चुकीच्या धोरणांचे ओझे सामान्य माणसाला हाकावी लागत आहे. त्यात सामान्य माणसाचे कंबरडे मोडले जात आहे, असे ते म्हणाले

जागतिक बाजारात क्रूड ऑईलचे दर सातत्याने कमी होत असताना त्याचा फायदा देशातील जनतेला होत नाही. आज आंतरराष्ट्रीय बाजारात क्रूड ऑईल ६५ डॉलर प्रति बॅरल असताना देशात पेट्रोलचे दर १०९ रुपयाच्या आसपास तर डिझेलचे ९३ रुपयांच्यावर आहे. भाजपा सरकार इंधनावर अन्यायकारक झीजिया कर आकारून जनतेची लूट करत आहे. क्रूड ऑईलचे कमी झालेले दर व कररुपी लूट कमी केली तर पेट्रोल ५१ रुपये आणि डिझेल ४१ रुपये प्रति लिटर करणे शक्य आहे ते सरकारने करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

सोमवारचा दिवस भारतीयांसाठी एकामागून एक धक्के देणारा ठरला. सकाळी शेअर बाजारात हाहाकार उडाल्याचे पाहायला मिळाले. सेन्सेक्स ३००० अंकांनी घसरला तर निफ्टीने १२०० अंकांनी खाली आला. मात्र, बंद होताना बाजार काहीसा सावरला. या धक्क्याने गुंतवणूकदारांचे १९ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या घोषणेचे तीव्र पडसाद जगासह भारतीय शेअर बाजारावर उमटल्याचे पाहायला मिळाले. यातच पेट्रोल, डिझेलच्या उत्पादन शुल्कात केंद्र सरकारने दोन रुपयांची वाढ जाहीर केली. तसेच त्यानंतर लगेचच एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात ५० रुपयांची वाढ करण्यात आल्याची माहिती समोर आली. केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील एक्साईज ड्युटी वाढवली तसेच गॅस सिलिंडरचे दरही वाढवले. यामुळे महागाई वाढून सामान्य जनतेच्या खिशाला मोठा भूर्दंड पडला आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची सरकारवर जोरदार टीका केली आहे.

## कृषी मंत्री माणिक कोकाटे यांच्या प्रतिमेस शेण फासुन शिवसैनिकांनी जोडे मारल



बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री यांनी शेतकऱ्यांनविषयी केलेल्या बेताल व अपमानास्पद वक्तव्याबद्दल शिवसेनच्या मध्यवर्ती कार्यालयासमोर जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली व शिवसेना पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी पदाधिकारी व शिवसैनिक यांच्या वतीने कोकाटे यांच्या प्रतिमेस शेण फासून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, सिंघन यांनी सांगितले की, महायुती शासनातील माणिक कोकाटे हा मंत्रीमंडळात ठेवण्यासाठी लायक नसुन वारंवार शेतकऱ्यांना बद्द्ल बेताल वक्तव्य करित आहे. यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांनची अवहेलना होत असुन त्याला ताबडतोब मंत्री पदावरून काढले पाहिजे.

## प्रभावी संघटन हिच कामगारांची खरी शक्ती:सुनिल झुंजारराव

### पोस्टल संघटनेच्या द्विवार्षिक अधिवेशनात धनंजय शेंडगे यांची विभागीय सचिव पदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड

बीड: डाक विभागातील कामकाजात मोठ्या प्रमाणात बदल होत असून, होत असलेला बदल स्वीकारत,सभासदांनी आपल्या ग्राहकांना ग्राहकाभिमुख सेवा देत आपल्या योजना सर्वदूर पोहचण्यास सतत प्रयत्नशील राहावे,आपल्या अनेक प्रलंबित प्रश्नाबाबत संघटना सकारात्मक प्रयत्न करत आहेच, संघटना ही प्रशासन व सभासद यांच्यामधील एक दुवा म्हणून कार्यरत असते,आपण सर्वांनी संघटित असल्यास सभासदाचे प्रश्न सहज मार्गी लागतात संघटन ही शक्ती आहे ,त्याकरिता सर्वांनी संघटनेच्या माध्यमातून एकसंघ असावे ,असे प्रतिपादन पोस्टल संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल झुंजारराव



यांनी या प्रसंगी बोलताना केले. संघटनेचे बीड विभागीय शाखेचे द्विवार्षिक अधिवेशन नगररोड वरील निलकमल हॉटेल मधील कॉन्फरन्स हॉल मध्ये वसंत भानोसे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. संघटनेचे नेते धनंजय शेंडगे यांनी संघटनेच्या माध्यमातून मागील दोन वर्षाचे कालखंडातील कामकाजाचा आढावा सादर करून,सभासदाच्या सर्व प्रलंबित प्रश्नाबाबत सविस्तरपणे चर्चा सभागृहात ठेवली. प्रसंगी शिवाजी नवले ,संजय सनातन सूर्यकांत गुट्टे,प्रकाश देशमुख,संतोष यादव,महादेव गोपाळघरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या अधिवेशनात पुढील दोन वर्षे करिता कार्यकारणी निवडण्यात आली. अध्यक्ष शिवाजी नवले, सचिव धनंजय शेंडगे तर खजिनदार म्हणून दिपक कुडके तर सह्यक सचिवपदी सुहास राक्षसभुवनकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पोस्टमन संघटनेच्या अध्यक्षपदी दादा वाघुंबरे तर समाधान खोसे सचिवपदी ... तर खजिनदारपदी पराजी उगले , तर ग्रामीण डाकसेवक संघटनेच्या अध्यक्ष म्हणून अनिससय्यद सचिवपदी सौरभ नवले तर खजिनदार उमेश बागलाने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय शेंडगे यांनी व सूत्रसंचालन नितीन आमटे तर आभार महेश चौंडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण सावंत, प्रशांत पाटील, रंजीत वाघ, विशाल घोरड, भारत वारंगुळे,फिरोज पठाण,जे के राठोड ,अंकुश चव्हाण , संदीप कोकाटे , हर्षल इंगोले,अजित काळे, संतोष भोंडवे, महादेव रसाळ, सचिन पुंडे, पांडूराजे घरत सखाराम आतकरे यांच्यासह अनेकांनी प्रयत्न केले या अधिवेशनास विभागातील मोठ्या संख्येने सभासद बांधव उपस्थित होते.



मानूर ।प्रतिनिधी शिरूर तालुक्यातील मातोरी येथे आदिवासी लोकवस्तीसाठी सात लक्ष रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून सदरील कामाचा शुभारंभ रविवारी करण्यात आला आहे.भालकेश्वर संस्थानचे वैद्यमूर्ती ह.भ.प स्वामी शंकरजी महाराज यांच्या हस्ते श्रीफळ फोडून योजनेच्या शुभारंभ करण्यात आला.



कवयित्री, सगर साहित्याची लेख संकलक माझी माणंस भगीनी सौ. संगीता अभय भामरे ह्या माझ्या निवासस्थानी सपत्नीक आल्या असता, त्यांना, त्यांच्या यजमानांना, भगीनीला, मुलगी कु.पल ला स्नेहबंध विशेषांक भेट दिला.

## बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना आदर्श प्रशासकीय अधिकारी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर



बीड प्रतिनिधी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड चे तहसीलदार चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके यांना आदर्श प्रशासकीय अधिकारी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पैठण, गेवराई, बीड अशा अनेक ठिकाणी तहसीलदार म्हणून उत्कृष्ठ काम केले आहे. अनेक पत्रकार यानी बातम्या लावून त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे. बीड मध्ये तहसील च्या कर्मचारी वेळेवर उपास्तीत राहून नागरिकांचे कामे वेळेत होतं असताना दिसत आहेत. श्रावण बाळ, संजय गांधी योजना चांगल्या पद्धतीने राबवून योग्य त्या व्यक्तींना लाभ देण्यात येतो. कधी नं होणारी मिटिंग दर महिन्याला होत आहे. अनेक लोकांना सुता सारखं सरळ करून योग्य ते काम बीड चे तहसीलदार शेळके सर करत आहेत. सर्वत्र त्यांचे कौतुक होतं आहे. या सर्व त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दाखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाना चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके यांना आदर्श प्रशासकीय सेवा लोकरत्न पुरस्कार ने सन्मानित करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार सोहळ्यास राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरिभाऊ नाना बागडे यांच्या हस्ते संभाजीनगर येथील एकनाथ रंगमंदिर येथे करण्याचे आयोजित केले आहे. 19 एप्रिल 2025 रोजी दुपारी 3 वाजता हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रशांत बंब,राष्ट्र संत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. आदर्श प्रशासकीय सेवा राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्काराचे पत्र देताना सं. अ. लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य चे बीबी वैद्य, प्रदेश सहसचिव सुनील महाकुंडे, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी आदी दिसत असून तहसीलदार शेळके साहेब यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होतं आहे.

# संपादकीय

## मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम

चैत्रमास त्यात शुद्ध नवमी ही तिथी,
गंध युक्त तरीही वाट उष्ण हे किती.
दोन प्रहरी का ग शिरी सूर्य थांबला. ...
राम जन्मला ग सखे ...राम जन्मला.

ह्या ग.दि.माडगूळकरांच्या रामजन्माच्या सुंदर वर्णन गीताने रामनवमीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचांगानुसार गुढीपाडव्यापासून चैत्र महिन्यातील नवरात्रीचा नववा दिवस असतो. ह्याच दिवशी भगवान विष्णूचा सातवा अवतार असणारे प्रभु श्री राम यांचा जन्म झाला.हा दिवस रामनवमी म्हणून साजरा करतात. या दिवशी दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर म्हणजेच बारा वाजता राम जन्माचा सोहळा साजरा करतात.

आज ६ एप्रिल २०२५रविवार रामनवमीचा उत्साह संपूर्ण भारतात साजरा केला जातो.आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये प्रभू श्रीरामचंद्राचे अवतारकार्य खूप महत्त्वपूर्ण आहे. प्रभू श्री रामचंद्र हे असे एकमेव अवतार पुरुष आहेत की ज्याने आपल्या मर्यादा पाळण्यासाठी सर्व सुखाचा त्याग केला असे म्हटले जाते. मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्राचे नाव घेतल्याबरोबर मोठमोठे पापे धुतली जातात. ते केलेले पाप नाहीशी होतात. एवढे मोठे सामर्थ्य रामनामात आहे. जे राम नाम जपात तल्लीन होतात त्यांच्यावर कोणते संकट येत नाही. नुसता राम शब्द मुखातून उच्चारला तरी संसार रुपी भवसागर तरुन जातो. एवढेच काय राम नामाची दोन अक्षरे मारुती (हनुमान अंगद यांनी दगडावर लिहून समुद्रात सोडले तर ते पाषाण (दगळ)समुद्राच्या पाण्यावर तरंगायला लागले.आणि संपूर्ण वानरसेनेने अशा प्रकारे रामसेतू तयार करून कसे लंकेत प्रवेश केला. एवढे सामर्थ्य राम या शब्दात आहे.

अयोध्या ही रामाची जन्मभूमी आहे. चैत्र शुद्ध नवमीला पुनर्वसु नक्षत्रावर माध्यान्ही अयोध्येत राजा दशरथ आणि राणी कौशल्येच्या उदरी या गोजि-या-हस-या साक्षात दैवस्वरूप श्री विष्णू अवतार प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला.आपले कर्तव्य, नैतिकका, शौर्य,त्याग, कर्तव्यपूर्ती भक्ती अशा नानाविध गुणाने मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्री रामचंद्र तिन्ही लोकात हे नाव अजरामर आहे. आपल्या पायाशी राजवैभव सुख लढत असताना एका क्षणात माता कैकयीच्या वचनाचा मान राहावा म्हणून दुःखमय वनवास भोगण्याची तयारी प्रभू रामचंद्राने दर्शवली. एक पुत्र म्हणून आपल्या मर्यादेचे पालन केले त्यांनी आपली सावत्र आई कैकयीला सुद्धा दुःखावले नाही. प्रभू श्रीरामचंद्र हे युद्ध नीती नियमाचे पालन कर्ते होते. अगोदर दुसऱ्यांना संधी द्यायची आणि मगच स्वतःशस्त्र हाती घ्यायचे. म्हणून ते एक नीतिमत्ता पाळणारे म रघुकूल योध्दा म होते. कधीही कुणाचा द्वेष केला नाही. प्रभू श्रीरामाना सहज राजवैभव मिळत असताना आपली सावत्र आई कैकयीच्या वचना खातीर ते १४ वर्षे वनवास सहज हसत हसत स्वीकारले. व आपला भाऊ भरताला राजसिंहासन स्वाधीन केले. तरीसुद्धा माता कैकयीचा प्रभू रामाने कधीही द्वेष केला नाही.मनुष्याने धर्मनीतीचे पालन कसे करावे?आपले आचरण कसे ठेवावेत हे फक्त प्रभू श्रीरामाच्या जीवन चरित्रावरून लक्षात येते. की आपल्या भावंडावर अतोनात प्रेम केले. त्यांनी आप्तीयावर कधीही क्रोध केले नाही. अनेक वेदना श्रीराम स्वतः सहन केले. आपल्या शत्रूला सुद्धा क्षमा केली. गुरुजनांचा,सज्जन महापुरुषांचा आदर केला. परस्त्रीला मातेसमान मानून तिला मान सन्मान देणारे अवतारी मर्यादा पुरुषोत्तम होते.श्रीराम अत्यंत बुद्धिमान होते म्हणून त्यांनी सामर्थ्य असतानाही अनीतीने किंवा कपट बुद्धीने आपल्या शत्रूंचा कधी संहार केला नाही. मित्र आणि बांधव यांचे वाईट करून जी संपत्ती मिळणार असेल त्या संपत्तीचा कधीच स्वीकार केला नाही.श्रीराम असतांना भरताला सिंहासन मिळणार ही गोष्ट लक्ष्मणला पटली नाही तेव्हा लक्ष्मणने भरताविषयी राग व्यक्त केला. तेव्हा श्री रामाने लक्ष्मणाला प्रेमाने समजावून सांगून मोठे आदर्श बंधू झाले. आणि प्रभू श्रीराम, माता सीता व लक्ष्मण हे तिघेही चौदा वर्षाच्या वनवासास निघून गेले. वाटते त्यांच्यावर कितीतरी संकटे आली प्रत्येक संकटाचा प्रतिकार केला. श्रीराम वनवासात असताना माता सीतेची अत्यंत काळजी घेत असायचे. त्यांचे मातासितेवर अत्यंत प्रेम होते,माता सीतेचे हरण झाल्यावर प्रभू श्रीरामांनी सामान्य मनुष्याप्रमाणे दुःखाचा पूर वाहवला. सीतेच्या शोध घेण्यासाठी देहभान विसरून शोध घेत होते. प्रभू रामाला माहित झाले की सीतेचे हरण रावणाने केले,तेव्हा प्रभू श्रीराम स्वतः जाऊन मातासीतेला आणू शकत होते.कारण ते अवतारी दैवी पुरुष होते. पण ते मर्यादित होते.त्यांना वानर सेनेच्या मदतीने युद्धनीतीने माता सीतेची रावणाकडून सुटका करायची होती. रावण हा असुरराजा होता. तो महापंडित, वेदशास्त्रसंपन्न विद्वान होता. भगवान शंकराचा परमभक्त होता. आणि प्रखर योद्धा सुद्धा होता त्याला हरविणे कठीण होते. तेव्हा रावणाचे बंधू विभीषणाच्या मदतीने नाभीत बाणप्रहार करून रावणाचा वध केला. एवढे सर्व झाल्यानंतर सुद्धा न थांबता रावणाचे बंधू विभीषण यांना रावणाचे अंत्यक्रिया करण्यास श्री रामाने सांगितले. या सर्व गुणांमुळे प्रभू रामाने मानव जन्मात येवून आपले दैवत सिद्ध केले. रावणाच्या वधानंतर श्रीरामाने लंका रावणाचे बंधू विभीषणाच्या स्वाधीन केले. आणि प्रभू श्री राम,माता सीता आणि बंधू लक्ष्मणासोबत अयोध्या नगरीत परतआले. प्रभु झश्रीराम उत्तम कर्तव्यदक्ष राज्यशासक होते.ते कुठे कमी पडले नाही. माता सीतेने आपल्या पावित्र्याची अग्निपरिक्षा देऊन सुद्धा एका व्यक्तीच्या लांचणाने गर्भिणी सीतेचे आपल्या धर्मपत्नीचा त्याग केला. तेव्हा लोकपवादाच्या भितीने श्रीरामाने माता सीतेला जरी राजमहालातून बाहेर घालविले पण त्यांच्या मनात सिताच होती.सीता त्यागानतंर रामाने आपले राज्यकारभार भावाला देऊन आपण विरक्त जीवन स्वीकारले. पुढे त्यांनी एक यज्ञ केले तेव्हा पत्नी म्हणून सीतेची प्रतिकृती तयार करून आपल्या शेजारी बसविले. दुसरी भारिया पत्नीला केली नाही आपल्या शेजारी बसविली.परंतु दुसरी थार्या (पत्नी ) केली नाही आपल्या हृदयातील सीतेचे स्थान त्यानी अठल ठेवले म्हणूनच श्री राम एकपतिव्रता आदर्श पती ठरले. अशा सत्यवचनी, मातृ-पितृ भक्त, एकवचनी, त्यागी,उदर व क्षमाशील रघुकुल योध्दाला अनेक युगानुयुगे कोणीही विसरणार नाही.

# आकाशवाणी मुंबई तारका प्रतिभा पाटील – बिर्जे

प्रतिभा पाटील - बिर्जे यांचे मुंबई जवळचे पालघर हे मूळगाव आहे. त्या पोर्तुगीज चर्चजवळ दादर रहात होत्या. त्यांचे माहेर, सासरचे घराणे सुसंस्कृत कलासक्त, सृजनशील.अत्यंत मोहक, बुद्धिमान, विनयशील, निगर्वी,अजात शत्रू आकाशवाणी तारका प्रतिभा पाटील यांचा जन्म ४ नोव्हेंबर १९५९ रोजी मुंबईत दादर मध्ये झाला. त्यांच्या आई तारामती पाटील सर्व कलाप्रेमी गृहिणी तर वडील हरिश्चंद्र पाटील हे पश्चिम रेल्वेत लोअर परळ कार्यशाळेत विभाग प्रमुख होते. त्यांचे शालेय शिक्षण विलेपार्ल्यात महिला संघ शाळेत झाले. त्यांनी बाराव्या वर्षी आत्मविश्वासाने अभिनेत्री प्रिया तेंडुलकर यांची मुलाखत घेतली आणि रसिकांची वाहवा मिळवली. प्रतिभा पाटील यांनी साठे महाविद्यालयातून बी.ए., एम.ए. विल्सन महाविद्यालया मधून सर्वोत्तम गुणांनी पदव्या संपादन केल्या. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वसंत देव, प्रा. चारुशीला ओक यांनी भाषेचे संस्कार, प्रोत्साहन दिले. पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्या नंतर त्यांनी रूपारेल मधून डी.एम. एल.टी. (पॅथॉलॉजी) केले. चर्नीरोडच्या रशियन केंद्रातून रशियन भाषेची पदवी मिळवून त्या भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. सन १९८६ पासून त्या नैमित्तिक करारावर मराठी/ हिंदी निवेदिका पदा सह आकाशवाणीच्या सर्व विभागांत आमंत्रित करायचे. मूळ मराठी असून, सर्वोत्तम उर्दू उच्चार, कार्यक्रमाचं कौशल्य केले. परिपूर्ण आयोजन, सुंदर सादरीकरणामुळे त्यांचे कार्यक्रम अविस्मरणीय आहेत. सन १९८७ मध्ये देशातल्या अनेक राज्यांतून आलेल्या हजारो उमेदवारांतून पहिल्या येऊन कायम स्वरुपी हिंदी निवेदिका पदावर सुश्री. प्रतिभा पाटील या आकाशवाणी मुंबई केंद्राच्या सेवेत रुजू झाल्या. याचे श्रेय त्या आकाशवाणीच्या त्यांच्या निस्वार्थ, भक्ती, समर्पिततेला देतात. मुंबई संवादिता केंद्राचे सुबह सवेरे, पहिलं एफ.एम. मुंबई केंद्राचे प्रसारण करण्याचा मान सन १९९२ मध्ये त्यांना मिळाला. त्यांच्या एफ.एम. गोल्ड, रेनबो केंद्रांच्या प्रारंभाच्या काळातले मनभावन, यादों के झरोखों से, असे अनेक कार्यक्रम त्यांनी लोकप्रिय केले. दुपार झाली की, आकाशवाणी मुंबई ‘अ’ संवादिता केन्द्राचे श्रोते आतूर व्हायचे ऐकायला, ‘यह आकाशवाणी का मुंबई केंद्र हैं। नारी जगत में प्रतिभा का प्यार भरा नमस्कार। आपल्या सुमधुर स्वरात श्रोत्यांच्या मनाला साद घालणाऱ्या या प्रतिभा म्हणजेच आकाशवाणी मुंबई केंद्राच्या ज्येष्ठ हिंदी निवेदिका सुश्री. प्रतिभा हरिश्चंद्र पाटील : सौ. प्रतिभा स्नेहल बिर्जे. आकाशवाणी मुंबई केंद्राचे आंबट गोड, कामगार सभेतल्या सहज सुचलं म्हणून,आपलं पत्र पोहोचलं, माझं आवार माझं शिवार मधल्या अवती-भवती श्रुतिका अशा कार्यक्रमांना अनमोल सहभाग दिला. आकाशवाणीच्या निबंध स्पर्धेत अनेक पारितोषिके त्यांना मिळाली. शीघ्र कवयित्री असलेल्या प्रतिभा पाटील बिर्जे यांनी अनेक आशयघन कविता लिहिल्या आहेत, तसेच अनेक सामाजिक समस्यांवर लिहिलेल्या कथा



आकाशवाणीतून सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सादर केल्या. आकाशवाणीला आपले कार्यक्षेत्र निवडणाऱ्या नवोदितांना त्या अनमोल मार्गदर्शन करायच्या.अशाच आकाशवाणीत भेटलेल्या कलाकारांना अभिनेते,अभिनेत्री प्रस्थापित झाल्याचे त्यांना कौतुक वाटे. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या व्यक्ती तपस्वी कलाकार यांच्या आकाशवाणीत मुलाखती घेण्यात त्या नेहमी अग्रेसर होत्या.’ नारी जगत’ कार्यक्रमात ज्येष्ठ पार्श्वगायिका ‘ महाराष्ट्र भूषण ‘ आशा भोसले यांची मुलाखत इतकी रंगली की, रसिकांच्या आग्रहास्तव पुनः प्रसारित करावी लागली. या मुलाखतीत संगीता सह आशाताईंचा स्वयंपाक घरातला वावर, खाद्य संस्कृतीवरचे त्यांचे विचार, गृहिणींशी व्यक्त केलेले मनमोकळं मनोगत; हे विशेष होते. ज्येष्ठ भजन सम्राट अनुप जलोटा, क्रीडा समालोचक सुरेश सरैया, सनदी अधिकारी नीला सत्यनारायण, इंग्लिश खाडी पोहून जाणाऱ्या आरती प्रधान, भारोत्तोलक मधुमती कटके, त्यांची सुद्धा आकाशवाणीतून अन्य मुलाखतीत सादर केली. कधी वातावरणातला बदल त्यांना कळला, तर आधीचे निवेदन बाजूला ठेवून असह्य उकाड्या नंतर नभ मेघांनी आक्रमिले, पाऊस सुरू झाला की, त्यांच्या प्रतिभेचा अप्रतिम आविष्कार त्यांच्या निवेदना सह वर्षा गीतांचा अपूर्व संगम होत असे. ज्येष्ठ आकाशवाणी निवेदक अमीन सायानी म्हणाले होते की, “ महोदया, आप यहाँ क्या कर रही हैं?, आपको दूरदर्शन पर आना चाहिये ! अशी स्तुति सुमने त्या विनम्रपणे स्वीकारीत. सौ. प्रतिभा पाटील - शेखावत कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा असताना, त्यांच्या जाहीर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुश्री. प्रतिभा पाटील यांनी इतके प्रभावी केले की, त्यांनी आग्रहाने सांगितले की, माझ्या या पुढच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन तुम्हीच करायचे. सौ. प्रतिभा पाटील यांनी सुश्री. प्रतिभा पाटील यांना दिलेली उत्स्फूर्त दाद न भूतो न भविष्यति आहे. स्वामी समर्थां वर एक सीडी आहे, त्याचं निवेदन प्रतिभा1 बिर्जे नी सुरेल आवाजात; ओघवत्या शैलीत केले आहे. त्यांना त्यांच्या सारख्या स्वभावाचे मनमिळाऊ, नेहमी प्रोत्साहन देणारे डॉ. स्नेहल बिर्जे हे पती लाभले. ज्यांनी समाजसेवक, माजी आमदार डॉ. माधव नारायण बिर्जे त्यांचा समाज सेवेचा वारसा पुढे चालवला. आकाशवाणी मुंबई केंद्राच्या महान तारका प्रतिभा पाटील बिर्जे दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी अकाली अस्ताला गेल्याने सर्व रसिकांची विनम्र श्रद्धांजली.

# शासकीय कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्यासाठी निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी उल्हास गिराम यांची जिल्हाधिकारी यांना मागणी



बीड : (प्रतिनिधी ) वाढत्या तापमाणामुळे बीड जिल्यात उष्णतेच्या झलाया वाढत आहेत. उषाघात, मळमळ, चक्कर येणे असे प्रकार वाढत आहेत. शासकीय कामानिमित्त शहरी व ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणावर युवक, महिला, वयोवृद्ध येतात. काहींना दिवसभर ताटकळत बसावे लागते. अशा नागरिकांना प्रखरउन्हाचा त्रास होऊ नये म्हणून जिल्यातील प्रत्येक कचेरी कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याचा पाण्याची सोय करावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिह्लाप्रमुख उह्लास गिराम यांनी जिह्लाधिकारी यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

येणारे तीन महिने प्रखर उष्णतेचे असतील. उष्माघाताच्या घटना वाढण्या आगोदर प्रशासनाने खबरदारी घ्यावी. वेळीच उपाययोजना कराव्यात. विविध शहरात बसस्थानाकाची कामे सुरु आहेत, त्याठिकाणी ही निवारा असावा. जिल्ह्यातील सर्वच प्रत्येकी तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, सत्र न्यायालय, निबंधक कार्यालय या सह श्यक्य होईल त्या प्रशासकीय कार्यालया बाहेर निवारा शेड व पिण्याच्या पाण्याची सोय करावी, असे शिवसेनेचे जिह्लाप्रमुख उह्लास गिराम यांनी जिह्लाधिकारी अविनाशजी पाठक साहेब यांची भेट घेऊन सदरील मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

या वेळी त्यांच्या समवेत उपजिह्लाप्रमुख अजिनाथ खेडेकर, राजु भाऊ मुहावले, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, शिरूर तालुका सोपान मोरे, कामगार सेनेचे रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, गणेश घुबर्डे, प्रदीप कोटुळे, सतीशसिह परदेशी, साईनाथ ढाकणे, दिलीप नाना पवार यांच्या सह आदी उपस्थित होते.

# कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कामगार कल्याण अधिनियम 1953 ची प्रभावीपणे अंमलबजावणी करू. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांचे आश्वासन

नवी मुंबई : ( सुभाष हांडे देशमुख) नवी मुंबई : महाराष्ट्र कामगार कल्याण अधिनियम १९५३ ची कोह्लापूर जिल्ह्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे ज्या आस्थापना, संस्था, शासकीय कार्यालये, हॉटेल्स, मॉल्स, कापड दुकाने, वाहतूक संस्था आदी. अशाप्रकारे या अधिनियमास अनुसरून पाच पेक्षा जास्त कामगार ज्या ठिकाणी काम करतात, त्यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजना व उपक्रमांचा लाभ मिळत नाही. ही बाब राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे अध्यक्ष सुरेश केसरकर यांनी जिह्लाधिकारी अमोल येडगे यांच्या निदर्शनात आणून दिली. त्यास अनुसरून त्यांनी विशाल घोडके सहा. कामगार आयुक्त यांना, राज्याचे कामगार आयुक्त यांना त्वरित पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी मुंबई, पुण्यातील एमआयडीसी मध्ये मिळणाऱ्या सोयी सुविधा कोह्लापुरातील कागल, गोकुळ शिरगाव, शिरोली, हातकणंगले एमआयडीसीत मिळण्यासाठी कामगार विभाग, एमआयडीसी, कौशल्य विकास विभाग आणि कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी या ठिकाणच्या रिक्त जागा व त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा आदी. सर्वसमावेशक माहितीवर आधारित आराखडा तयार करुन भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करावे, अशा सूचना देखील त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

१०० दिवसांचा कार्यालयीन



सुधारणा विशेष, कामगार संघटनांच्या मोहिमे अंतर्गत जिह्लाधिकारी कार्यालय व कामगार आयुक्त कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ‘‘जिल्ह्यातील कामगार संघटनांशी चर्चा सत्र व उद्योगाच्या अडचणींच्या निराकरणाबाबत कामगार संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजकांसोबत दिनांक ३ एप्रिल २०२५ रोजी जिह्लाधिकारी कार्यालयातील शाहूजी सभागृहात जिह्लाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी कोह्लापूरचे सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके, इचलकरंजीच्या सहाय्यक कामगार आयुक्त जानकी भोईटे इतर वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना जिह्लाधिकाऱ्यांनी कोह्लापूर जिह्ला बाल कामगार मुक्त करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करुया. जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी बालकामगार आढळल्यास याची माहिती सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयास कळवावी असे आवाहन करुन, जिल्ह्यातील उद्योगधंद्यात वाढ होण्याबरोबरच कामगारांचे कल्याण साधण्यासाठी कामगारांशी संबंधित जिह्ला पातळीवरील प्रश्न जिह्ला प्रशासन प्राधान्याने सोडवेल तसेच शासन स्तरावरील प्रश्न शासनाला सादर करण्यात येतील. विविध उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेला उद्योजकांनी प्राधान्य द्यावे असे सांगितले. ते पुढे म्हणाले की, कामगारांच्या सुरक्षिततेसाठी जनजागृतीपर शिबीरे, उद्योग क्षेत्रांच्या आवारात, एमआयडीसी परिसरात बचत गटांच्या माध्यमातून माफक दरात भोजन व्यवस्था, इंडस्ट्री ऑडिट, विमा, फायर सेफ्टी, कारखाने कंपन्यांमधील सुरक्षितता, कामगार व त्यांच्या मुलांचे आरोग्य, शिक्षण, रात्रीच्या वेळी परगावाहून येणाऱ्या कामगारांसाठी निवास व्यवस्था, उन्हाळ्यात अचानक आपत्ती ओढवू नये यासाठी खबरदारी, हजेरी पत्रक, पगार पत्रक, अंतर्गत रस्ते आदी. विषयांना अनुसरून त्यांनी उद्योजक व कामगार प्रतिनिधींशी संवाद साधला. या बैठकीत कामगार संघटना प्रतिनिधींनी कामगारांना येणाऱ्या अडचणी मांडल्या. सहा. कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना पूर्वी प्रमाणे तपासणीचे अधिकार, कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळावे, कामाचे तास निश्चित करावेत, भविष्य निर्वाह निधीचे लाभ मिळावेत. जिल्ह्यातील (ESIC) हॉस्पिटलमध्ये डॉक्टर, कर्मचारी यांची भरती व्हावी, यंत्रमाग कामगारांचे प्रश्न, साखर उद्योगातील कामगारांना शासनाच्या त्रिपक्षीय करारानुसार वेतन देण्याची मागणी अशा जिल्ह्यातील कामगार वर्गाशी संबंधित अनेक प्रश्नांना अनुसरून मते व्यक्त केली. त्यास अनुसरून जिह्लाधिकारी अमोल येडगे यांनी सर्वच बाबतीत सहकार्य केले जाईल, असे आश्वासन दिले.

# चटका लावणारी एक्झिट !



अभिनयाच्या विविध कंगोऱ्यातून अंगीकारलेल्या भूमिकेला रसिक प्रेक्षकांच्या केवळ पसंतीसच नव्हे तर लक्षवेधी अशी भूमिका साकारून आनंद देणारे अभिनेते डॉक्टर विलास उजवणे यांचे अकस्मात जाणं मनाला चटका लावून गेलं. जीव ओतून काम करण्याची हातोटी, दमदार आवाजातील वैशिष्ट्यपूर्ण स्वच्छ, सुस्पष्ट, पहाडी संवादफेक, सहज, सुंदर, नैसर्गिक मुद्राभिनय ही त्यांची खास आयुधं होती. डॉक्टरांनी सुमारे सदुसष्ट मराठी नाटके, एकशे दहा अधिक चित्रपट, एकशे चाळीस मालिका साकारत हिंदीतही आपल्या अभिनयाची छाप तेवढ्यात ताकदीने उमटवली. चार दिवस सासूचे, दामिनी, वादळवाट आदी अनेक मालिकां, नाटक, चित्रपटांमधून महत्वपूर्ण व्यक्तिरेखा साकारत त्यांनी आपल्या अभिनयाचे विविधांगी कंगोरे पेश करून जो आनंद दिला तो कायम रसिक मनावर राहणार आहे. अनोखी अभिनय शैली आणि संवाद पैकीच्या बळावर कलाक्षेत्रात वेगवेगळे स्थान निर्माण करणारे डॉक्टर विलास उजवणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

विश्वनाथ पंडित, ठाणे
9588450442

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ८ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


# नेरुळ वसाहतीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहाने साजरा



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. कांदिवली पश्चिम येथे रामनवमी निमित्त श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कांदिवली मधील ज्ञानोबा तुकाराम वारकरी सांप्रदायिक भजन मंडळ ( वासकर फड) मार्फत इराणी वाडी, श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था, विठ्ठल मंदिर कांदिवली पश्चिम येथे श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.विभागातील महिलांनी या श्रीराम जन्मोत्सव सोहळा प्रसंगी पाळणा गायला,टाळ, मृदुंग, विणा व सुमधुर आवाजात भजनी मंडळांनी अभंग गाऊन वातावरण भक्तिमय केले.या प्रसंगी निवृत्ती भोजने, दिलीप कुचेकर, विष्णु पिसे, नामदेव पिसे, कुमार सुगावे बालाजी सूर्यवंशी, सुनील भगत, सुनील पिसे,प्रकाश कुचेकर, संतोष पिसे, आप्पासाहेब कुचेकर, मल्हारी लाळगे, रमेश पिसे व इतर पुरुष आणि महिला या श्रीराम जन्मोत्सव सोहळा प्रसंगी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते, या वेळी सुंठवडा व केळी यांचा प्रसाद वाटप करण्यात आला, एकंदरीत मोठ्या भक्तिभावाने भक्तीमय वातावरणात श्रीराम जन्मोत्सव सोहळा संपन्न

# नेरुळ वसाहतीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहाने साजरा

नवी मुंबई (सुभाष हांडे देशमुख) नवी मुंबई : नेरुळ उपनगरातील सेक्टर ९ मधील एन एल टू टाईप च्या वसाहतीत श्रीराम नवमी सार्वजनिक उत्सव समितीच्या विद्यमाने श्रीराम जन्मोत्सव दिनांक सहा एप्रिल रोजी मोठ्या उत्साहाने पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. भजन, राम जन्मोत्सव सोहळा, महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, सत्यनारायणाची महापूजा, लहान मुलांच्या व मुलींच्या विविध स्पर्धा आदि उपक्रम आयोजित करुन श्रीराम जन्मोत्सव आनंदी वातावरणात साजरा झाला. वसाहतीतील नागरिकांनी व मुलांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात भाग घेऊन उत्सव अधिक भारदस्त केला. त्याचप्रमाणे माजी नगरसेविका श्रीमती मीरा पाटील, श्रीमती शिल्पा कांबळी, माजी नगरसेवक



संतोष शेट्टी, सुरेश शेट्टी तसेच रामचंद्र पाटील, शशी जोशी, जयेश भावसार, महादेव जाधव, सुभाष हांडे देशमुख आदि अनेक मान्यवरांनी सहयोग देऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली.

गेली २१ वर्षे सातत्याने साजरा होत असलेल्या या उत्सवात नेरुळ वसाहतीत सेक्टर ९ मध्ये मोठी रथयात्रा काढण्यात आली. रथामध्ये लहान मुलांनी वेशभूषा करुन राम, सीता, लक्ष्मण व हनुमान यांची भूमिका रेखाटली होती. बहुसंख्य महिलांनी डोक्यावर कलश घेऊन या रथयात्रेत उत्स्फूर्तपणे भाग घेतला आणि कार्यक्रम अधिक अधोरेखित केला. हजारो नागरिकांनी या यात्रेत सहभाग घेतला व एक आदर्श निर्माण केला. प्रसंगी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. उत्सव समितीचे अध्यक्ष विजय निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेला हा दिवसभरातील सोहळा अशोक मते, शरद भाट, दर्शन (भाऊ) आंग्रे, भूषण पाटील, मोहन सरगर, सचिन ढवळे, रवी सरगर, अजिंक्य सूर्यवंशी, रोहन गायकवाड, यशवंत गोणेवाड, अक्षय निंबाळकर आदीं स्वयंसेवकांनी अपूर्व मेहनत घेऊन यशस्वी केला.

# माय मातीशी ईमान राखून, माणूसधर्म जोपासणारा आम्ही रानातली फुले: विद्रोही कवी साहेबराव मोरे

माय मातीशी ईमान राखून, माणूसधर्म जोपासणारा "आम्ही रानातली फुले": विद्रोही कवी साहेबराव मोरे "आम्ही रानातली फुले" हा विद्या सरपाते यांचा काव्यसंग्रह वाचनात आला.कवियत्री पोलिस पाटील पदावर कार्यरत आहेत. गावातील भांडण- तंटा, सामाजिक कलह, कौटुंबिक बखेडा व सभोवतालच्या घटनांव्ये जेजे संदर्भ, अनुभव ते सर्व आपल्या काव्यप्रतिभेत ओवून एक वाचनीय काव्यसंग्रह साहित्य जगतात उपलब्ध करून दिला आहे सरपातेंची कविता खलप्रवृत्ती,अन्याय व अत्याचारांच खंडन करणारी आहे, तसेच शेतीशिवार, सामाजिक जीवन मूल्य, नातीगोती, कुटुंबकबिला, जल,जमीन, जंगलाशी नाते सांगणाऱ्या आदिम जमातींशी लेखणीचं विशुद्ध नात जपणारीही आहे 'आम्ही रानातली फुले " हे शीर्षक हेच अधोरेखित करते माय मातीत उगवलेली नाती गाव आणि शिवाराशी घट्ट जुळलेली असतात आज शहराकडे आकृष्ट होणाऱ्या शानशौकतची ओढ लागलेल्या पिढीला वास्तव जाणीव करून देताना कवियत्री लिहिते, "मूल वाढते गर्भात अन्न पिकविते माती लाज झाकण्याचे वस्त्र माय मातीच्याच हाती"(आळं) जागतिकीकरणाच्या रेट्यात आजही मूळनिवासीभारतीय आदिम विकासापासून कोसो दूर आहे, तरीही आदिवासी निसर्गाशी ईमान राखूनच जगत आहे. शीर्षस्थानी असलेल्या कवितेतून हीच जीवनमूल्ये सरपाते अधोरेखित करताना लिहितात, "निसर्गाच्या संस्कृतीला संस्कारानं भरतो दया,क्षमा, दानं अंतर्रमगात कोरतो पुस्तकाच्या वासासाठी मनी मात्र झरतो आम्ही रानातली आम्ही वार्यावर डोलतो" शिक्षणापासून वंचित राहिलेल्या 'आउतपिट्या' कवितेतील अविद्येचा बळी ठरलेल्या तरूणाच आक्रंदन 'नांगराने जमीन चिरावी तसा मी चिरत जातो हि सल व्यक्त करणार्या वास्तवाच्या विस्तवालाही धग देणार्या ओळी, "बापानं दावणीला बांधलं तसं व्याज आणि मी सोबतच वाढलो" कवयित्रीच्या चिंतनशील प्रवृत्तीला दाद द्यावी लागेल. विषय वैविध्यपूर्णता हे एक गुणवैशिष्ट्य कविता वाचताना प्रकर्षाने जाणवते."लांग" हे निसर्गराजाची बल्हारी गाणार अप्रतिम गीत "गंध घामाचा होऊन हेलकावतो मोहोर शिणभाग घालवण्या आला पळसा बहर" तल्लखीच्या उन्हाळ्यात वखवखलेल्या रानात लालसर परसमोहोर पाहून मन हरखून जात.अशा अद्भूत निसर्गरम्य मनोहारी अनुभूती देणार्या कविता संग्रहाचे बलस्थान आहेत मनाच्या गाभाऱ्यातून उमटणाऱ्या भावनांना तरंग म्हणजे कविता.कवियत्रीचे भावविश्व समृद्ध असुन सत्शीलतेचे कोंदण लेवून आलेल्या बर्याच भावविभोर कविता संग्रहात भेटतात .या पुष्ट्यर्थ,'पान्हा ,पारोसा,ऋतुगंध,उषा,आळं, बाभूळ,हिरवी मूठ,अंतर,मांढऱ्हान, स्पंदन,पळस,उमाळे आदी कविता लक्ष वेधून घेतात.सरपाते शिक्षक कन्या आहेत बालपणापासून बाबांच्या परिवर्तन चळवळीत, मानवतावादी मूल्यांचे बोट धरून आल्याने प्रस्थापित सामाजिक परिस्थितीशी झगडतानाची आंतरिक तळमळ बहुतांश कवितांमधून व्यक्त होताना दिसते 'कलम' कवितेतून विचारप्रवर्तक महापुरुषांची थोरवी गायली आहे," माळरान पडित नांगरली शाहुनं बैल हाकतो ज्योती आसूड उगारून दीन दलितांना ठेवलं राखीव रानं कसण्या दिलं मोफत शिक्षणाचं वाण धुऱ्यावर लावलीत कलम बाबानं" महाराष्ट्र मातीत पुनर्जीवित झालेल्या बौद्ध तत्त्वज्ञानाचा वारसा जपण्याचा आग्रह धरणारी मांडणी, "महाराष्ट्राच्या मातीतल्या रक्त विरहित क्रांती कथा दीक्षाभूमी चैत्यभूमी आदराने टेकवावा माथा" सम्यक क्रांती घडवूनच मानवमुक्तीचा संगर जिंकता येईल,या अनूरोधाने बौद्धधम्मानुनय अंकीत करणारी,'बुद्धगया' "रानं माझं बुद्धगया पिक घेतात वंदना येती पाखरं विहारी जागवत संवेदना स्वयं प्रकाशित बना जाती सांगून उडाया



" आईबापांच्या नात्यातील अतुट धागा म्हणजे दुर्दम्य विश्वास हे ठाशीव पणे सांगणारी 'जोडणी' ही कविता सरपातेंच्या वैचारिक प्रगल्भतेची साक्ष देते, "माय घराची ओसरी बाप ओसरीची मेढ नाही कोसळत घर जरी निर्माणली तेढ" अंतरीचे अनुबंध उलगडून लेकीची महती विशद करणारी अप्रतिम भावोत्कट रचना, "लेक सृष्टीचा सोहळा मूल्य संस्काराच बीजं सासरच्या -माहेरच्या मातीमंधी खोल रुज कर्तृत्वान उजळून भावी पिढी घडवेलं " अशा अनेक भावार्थ रचना वाचताना मनात रुंजी घालतात अतिशय सहज सोपी भाषा, गेयतापूर्ण वैदर्भीय शब्द कळा-.... वानुळा, पोहरा, पहाटेच्या पारी, कुडावर, पालवी, वळणीवस्तरी, आरेपाष्टे, शेंदून,डाले इ. हे भाषिक गुण विशेष म्हणता येईल मनोवेधक, लयबद्ध यमक,प्रतिमांचा चपखल वापर असणाऱ्या बहुतांश कविता मनाला भावतात, भिडतात पहाट -कवितेच्या ओळी"वारा भटके रानोमाळ मोहरून गेल्या रानवाटा पहाटेच्या पायामंधी रूतून बसतो बाभूळकाटा " सरपातेंचे निसर्ग, जीवसृष्टी विषयक आत्मचिंतन सराहनीय आहे. काव्यसंग्रहास डॉ. विजयकुमार कस्तुरेंची अभ्यासपूर्ण विवेचनातून आलेली चिकित्सक प्रस्तावना लाभली आहे .काव्य सौंदर्याचा वारसा सांगणाऱ्या विद्या सरपातेंची ऊर्जाशील पाठराखण केली आहे सुरेश येरमुले यांनी. नंदू वानखेडे यांचे मुखपृष्ठ आशयसंपन्न संकर्षित करणारे असून अंतरंगाचे सौंदर्य व काव्याषयाला सुलभ करणारे रेखाटनेही संग्रहात भेटतात. एकूणात मायमातेशी ईमान राखून माणूसधर्म जोपासणारा "आम्ही रानातली फुले" हा विद्या सरपातेंचा काव्यसंग्रह स्वागतार्ह आहेच!!! उदयोन्मुख कवियत्री विद्या सरपातेंची भलावण निडर चिंतनगर्भवृतीसाठी अटळ ठरते. परिवर्तनवादी लेखन कार्यासाठी, कसदार साहित्यिक वाटचालीसाठी कवियत्री विद्या सरपातेंना मंगलमय शुभकामना पाठराखण!!! समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव शब्द संवाद:९४०४०४८६०१ आम्ही रानातली फुले: काव्यसंग्रह कवयित्री: विद्या सरपाते प्रकाशन: परिस, सासवड मूल्य:१७०₹

## महावीर जयंतीनिमित्त डोंबिवलीत भव्य उत्सव; प्रज्ञा पंडित यांचे डिजिटल डिटॉक्सफ्वर मार्गदर्शन

भगवान महावीर जन्मकल्याणक उत्सवानिमित्त जैन कासार मंडळ, मुंबई यांच्या वतीने एक भव्य कार्यक्रम डोंबिवली येथे गुरुवार, १० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४.३० या वेळेत श्री सिद्धिविनायक सभागृह, पं. दीनदयाळ चौक, डोंबिवली (प.) येथे संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमात प्रा. सौ. डॉ. प्रज्ञा मनीष पंडित यांचे "डिजिटल डिटॉक्स – सोशल मीडियाच्या मर्यादित वापराचे फायदे" या विषयावर व्याख्यान असणार आहे. आधुनिक युगात सोशल मीडियाचा अतिरेक आणि त्याचे परिणाम लक्षात घेता हे मार्गदर्शन प्रबोधनात्मक ठरणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती सविता चंद्रकांत साळवी (उपाध्यक्षा, जैन कासार मंडळ) असणार आहेत. या व्याख्यानाचे समन्वयन उपाध्यक्षा सौ आशा मांगले यांनी केले आहे. या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष श्री अनिल बीजितकर, उपाध्यक्षा श्री. दिपाली महिन्द्रे यांनी मंडळाच्या वतीने आले आहे.

## बालवयातच कलात्मक धोरण अवलंबून सामाजिक बांधिलकी जपणारी हरहुन्नरी कलावंत ईश्वरी रविंद्र लोहोटे ..!

ईश्वरी रवींद्र लोहोटे एक कलागुणसंपन्न नृत्यांगना आणि गोड गळ्याची गायिका. जणू काही वैखरीवर सरस्वतीचा वास आहे की काय असं भासणारी गोड गळ्याची गायिका म्हणजेच ईश्वरी. आतापर्यंत ईश्वरीने अनेक गायन आणि नृत्य स्पर्धेत सहभागी होऊन अव्वल नंबर मिळवून अनेक पुरस्कार संपादन केले आहेत. तिच्या या कलेचे मुंबईतूनच नव्हे तर महाराष्ट्रातून देखील कौतुक होत आहे. ईश्वरीने आपल्या कला कारकीर्द मध्ये विविधांगी कार्यक्रम केले असुन त्यांत एकेरी गायन स्पर्धा, ग्रीटिंग कार्ड बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, समूह गायन स्पर्धा अशा अनेकविध कार्यक्रमांचा समावेश आहे. ईश्वरीने आतापर्यंत अशा अनेक स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. शालेय शिक्षण पूर्ण करता करता आपली आवडही जोपासण्याचा प्रामाणिक प्रयत्न ईश्वरीने केला आहे आणि आजतागायत ती करत आहे. आपली गायनकला आणि नृत्यकला अंगीकारत असताना ईश्वरीला सामाजिक कार्याची आवड देखील तितकीच महत्वाची वाटते. मग त्यासाठी अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमात जाऊन गोरगरिबांना फळे वाटप, अन्नधान्य वाटप करत समाजोपयोगी कार्याची जाणीव ठेवली आहे. आणि एक बाल सामाजिक कार्यकर्ती म्हणून ईश्वराची गणना होते. आजवर ईश्वरीचे अनेक सेवाभावी संस्थेने कौतुक करून तिचा यथासांग सन्मान केला आहे त्यात प्रामुख्याने जनजागृती सेवा समिती, बदलापूर, साप्ताहिक भगवे वादळ, त्याचबरोबर तिच्या दैदिप्यमान कार्याची दखल घेऊन आर्यारवी एंटरटेनमेंट प्रॉडक्शनच्या तिसऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव मध्ये तिला नुकताच कलाभूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बालवयातच कलात्मक धोरण अवलंबून सामाजिक बांधिलकी जपणारी ईश्वरी ही एक गुणी आणि हरहुन्नरी कलावंत आहे. ईश्वरीला पुढील वाटचालीसाठी खुप साऱ्या शुभेच्छा.

## जागतिक आरोग्य दिन गांधी बाल मंदिर मध्ये साजरा..

गांधी बाल मंदिर हायस्कूल मध्ये श्री महाराष्ट्र बटालियन बॉईज आर्मी युनिट च्या वतीने 7 एप्रिल 2025 रोजी जागतिक आरोग्य दिन (वर्ल्ड हेल्थ दे )आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर अंजली तळवलकर उपस्थित होत्या त्यांनी आरोग्य विषयक चांगल्या सवयी ,संतुलित आहार यावर मार्गदर्शन केले. तसेच श्री विचारे सर यांनी आरोग्य विषयक नैसर्गिक आहाराविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर यांनीही विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती दिली सदर कार्यक्रमांमध्ये श्री दत्ता शिंदे सर ,सौ विजया सालावकर मॅडम ,श्री अमोल जागले, सर श्री अवधूत चव्हाण सर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे एनसीसी ऑफिसर व सहाय्यक शिक्षक श्री विश्वनाथ पांचाळ यांनी केले होते.

********

## मंगेशकर रुग्णालयाचा धिक्कार

पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तनिषा भिसे या गर्भवती महिलेला उपचारासाठी दहा लाख रु भरता न आल्याने आणि रुग्णालयाच्या गलथान कारभारामुळे जीव गमवावा लागला.रुग्णालय प्रशासनाने महिलेच्या जीवापेक्षा पैशाला जास्त महत्त्व दिले. मंगेशकर कुटुंबियांना एक चांगले वलय आहे पण या बेजबाबदार पणाच्या वागण्याने त्यांचा सर्वत्र धिक्कार होत आहे.सरकारी कोट्यातून केवळ एक रुपये महिना भाडेतत्वावर या रुग्णालयाला जागा मिळालेली आहे.भिसे दांपत्याची तीन लाख रुपये भरण्याची तयारीही दाखविली होती पण हॉस्पिटल प्रशासन दहा लाख रुपये पाहिजेत म्हणून अडून राहिले.मयत भिसे यांचे पती भाजपा आमदाराचे पी ए म्हणून काम करीत असल्याने आमदाराने स्वतः तसेच मुख्यमंत्री कार्यालयातून देखील हॉस्पिटलला फोन करण्यात आला तरीही रुग्णालय प्रशासन दहा लाख रुपयांवर अडून बसले.अशी अनेक रुग्णालये राज्यात आहेत की त्यांनी अत्यंत माफक दरात जमिनी शासनाकडून घेतलेल्या आहेत. शासनाचे देखील त्यांना समाजासाठी काही करण्याचे निर्देश नियम दिलेले आहेत.पण कोणीच हे नियम पाळताना दिसत नाही.परिणामी काहीवेळा रुग्ण दगावतो, त्याच्या जीवावर बेतते.भिसे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या मंगेशकर रुग्णालय प्रशासना वर कठोरात कठोर कारवाई व्हायला हवी.

गणेश हिरवे
जोगेश्वरी पूर्व

## प्र - बोध ( प्रसंगातून बोध)३०४ श्रद्धा

"तुम्ही आस्तिक आहात की नास्तिक?" नव्याने ओळख झालेल्या महाशयांना जयने प्रश्न विचारला.

"मी श्रद्धावान आहे " महाशय.

"म्हणजे?" त्यांच्या या उत्तरावर जय संभ्रमित झाला होता.

"कित्येक लोक देव मानत नाहीत, त्यांच्या ठायी मंदिरातला देव म्हणजे दगड, तर कित्येक भाविक मंदिराच्या बाहेर रांगेत दर्शनासाठी ताटकळत उभे असतात.

पण जे देवाला दगड मानतात त्यांची सुद्धा कुठेतरी श्रद्धा असते एखादी थोर व्यक्ती, आई किंवा वडील, शिक्षक,मार्गदर्शक हे त्यांचे श्रद्धास्थान असते तसेच माझे श्रद्धास्थान माझी आई आहे आणि हो! जगात एक अज्ञात शक्ती आहे याच्यावर माझा विश्वास आहे ", त्यांनी जयचा संभ्रम दूर केला.

बोध - १)जगात एक अज्ञात शक्ती आहे हे कोणीही नाकारू शकत नाही.

२) श्रद्धा दगडावर असो की एखाद्या मनुष्यावर दोघांनाही श्रद्धेमुळे कार्यकर्तृत्वाचे बळ मिळते.

सौ. विद्या मलवडकर (विद्याराणी)
तारगाव सातारा.

## वाडदेवाडीतील रामनवमी उत्साहात साजरी !



चिपळूण. : वाडदेवाडी (तुरंबव ) येथील श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने रामनवमीचा उत्सव अत्यंत थाटात, उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रामजन्म समयी उपस्थित महिला वर्गाने राम जन्माच्या ओव्या, पाळणा गीत गाऊन वातावरण भारावून टाकले. यावेळी कीर्तनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता सोबत वाडदेवाडीतील युवा आणि ज्येष्ठ मंडळींनी एकत्रितपणे पारंपारिक जाकडी नृत्यासह पारंपरिक गाणी गाऊन कार्यक्रमाला अधिकच शोभा आणली. विशेष म्हणजे रामनवमीचा या सुंदर, देखण्या आणि नेत्रदीपक उत्सवाची आंखणी, आयोजन, नियोजन व नेतृत्वही संपूर्णपणे वाडदेवाडीतील युवकांनी केले होते हे विशेष. यावेळी अन्य गावातीलही रामभक्त आवर्जून उपस्थित होते.

विश्वनाथ पंडित ९५८८४५०४४२



माजलगाव येथील राजस्थानी समाज महिलांच्या वतीने गणगौर उत्सवात मोठ्या स्वरूपात वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.माजलगाव मधील संपूर्ण राजस्थानी समाजातील महिलांनी जुना मोंढ्यातील गणपती मंदिर येथून मिरवणुकीला सुरुवात केली. गणपती मंदिर येथे गौर चे गाण्यावर नृत्य व फुगडी खेळून आनंद साजरा केला.यास मिरवणूक व मंदिर येथील कार्यक्रमास माहेश्वारी महिला मंडळांच्या अध्यक्षा माया चांडक व सचिव सरोज तोष्णीवाल व सर्व महिला पदाधिकार्याचे सहकार्य लाभले.

# "शिवाजी फक्त वेशभुषेत नव्हे तर वर्तनात दिसले पाहिजे " निगडीतील शिवभूमी विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग

4 एप्रिल 2025 रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी निमित्त निगडी परिसरातील शिवभूमी प्राथमिक विद्यालय येथे इयत्ता पहिली ते चौथी च्या विद्यार्थ्यांसाठी शिवव्याख्यान आयोजित करण्यात आले त्यासाठी मावळ तालुक्यातील प्रबोधनकार कवी लेखक मार्गदर्शक निवेदक माननीय श्री सागर भाऊ वाघमारे यांना विद्यालयातील तंत्रशिक्षिका कवयित्री लेखिका कोठेकर योगिता यांनी आमंत्रित केले होते त्यादिवशी शिवाजी महाराज विषयावर चित्र रंगभरण भाषणे तसेच राजमुद्रावरील लेख प्रसंगचित्र अशा विविध प्रकारे शिवरायांचे चरित्र विद्यार्थ्यांसमोर प्रदर्शित केले गेले . मा श्री सागरभाऊ वाघमारे यांनी आपल्या व्याख्यानातून शिवाजी महाराजांच्या कथा अतिशय मार्मिक पद्धतीने व रंजकपणे विद्यार्थ्यांसमोर सादर केल्या . शिवरायांच्या कार्याशी त्यांच्या उदाहरणाशी त्यांनी आजच्या जीवनाची सांगड घालत विद्यार्थ्यांना शिवाजी महाराजांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे फायदे समजावून दिले तसेच शिवाजी महाराजांना ज्याज्या गोष्टींचा उपयोग झाला त्या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांपर्यंत त्यांनी आपल्या व्याख्यानातून



पोहोचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला "शिवराय फक्त वेशभूषेतून नाही तर वर्तनातून दिसायला हवे " हे त्यांचे वाक्य सर्व शिवभुमी परिसरातील विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक वर्ग यांना स्पर्शून गेले या कार्यक्रमाला उपस्थित शिवभूमी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ पाटील अश्विनी यांनी व्याख्याते मा .सागरभाऊंचे आभार मानले आणि शिवरायांविषयी आपले मत प्रकट केले तसेच त्या शाळेतील हे व्याख्यान घडवून आणणाऱ्या कोठेकर योगिता संजय यांनी विद्यार्थ्यांकडून शिवरायांवरील चारोळ्या व कविता गायन सादर केले हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शिवभूमीच्या शिक्षक वर्गानी पालकांची मने जिंकून घेतली उपस्थित सर्व समितीच्या पालकांना हा उदबोधननाचा उपक्रम खूपच आवडला त्यामुळे शिवभूमीचे विद्यालयाचे सर्व क्षेत्रातून कौतुक ऐकायला मिळत आहे .

# ठाणे येथे गझल लेखन कार्यशाळा आणि कवी संमेलन मोठ्या जल्लोषात पार पडले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. निलपुष्प साहित्य मंडळ ठाणे आणि बाजीगर साहित्य सेवा प्रतिष्ठान आंधळी, पलूस यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथे गझल लेखन कार्यशाळा आणि कवी संमेलन मोठ्या जल्लोषात पार पडले.रविवार दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी दुपारी २ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत ठाणे पश्चिम येथील आनंद विश्व गुरुकुल तीन हात नाका, रघुनाथ नगर या ठिकाणी घेण्यात आलेल्या विनामूल्य मराठी गझल लेखन कार्यशाळेत गझलकार सिराज शिकलगार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,"आपल्या आयुष्यातील चांगल्या वाईट गोष्टी प्रकर्षाने आठवतात,गुढ निर्माण करणारे शेर गझलेत असावेत, शब्दातून समाजाला प्रबोधन करायला हवे, जागतिकीकरणाचा फायदा करून घ्यावा, कविता आणि गझल या दोघी बहिणी आहेत. गझलेत विचार करायला लावणारी रचना असावी." तसेच राजेश साबळे यांनी निलपुष्प साहित्य मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला.या दिवशी रामनवमी असल्याने कवी कवयित्रींनी श्रीराम विषयावर कविता,पाळणा सादर करून काव्य संमेलनात वेगळीच रंगत आणली.तर पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते



भारत कवितके यांनी आपल्या" आज विठू तुझ्या पंढरीत मी आलो," ही कविता सादर करून वातावरण भक्तिमय केले, काव्य रसिकांना पंढरपूर ला गेल्याचा भास निर्माण झाला.सिराज शिकलगार सरांनी मार्गदर्शन करताना अनेक गझला सादर करून गझल प्रकाराबद्दल बहुमुल्य मार्गदर्शन केले.तर नागेश हुलवळे तानाजी राव झांबरे सावित्री झांबरे यांनी आलेल्या कवी कवयित्रीचे स्वागत करुन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.या गझल लेखन कार्यशाळेत व कवी संमेलनात यांनी भाग घेऊन कविता सादर केल्या.आईचे प्रेम, बायकोचे प्रेम,विरह,रमाईचे लग्न, भक्ती रचना अशा विविध विषयांवर कविता सादर करण्यात आल्या. या गझल लेखन कार्यशाळा आणि कवी संमेलनात भारत कवितके, नागेश हुलवळे, सावित्री झांबरे, लक्ष्मण माळी, अभिमन्यू गायकवाड,उदय क्षिरसागर, संदीप कांबळे, आनंद रांजणे, शैलजा ताई गिरनारकर, निवृत्ती कोरडे, हरिश्चंद्र मिठबावकर,निलम शेलटे,लिलाताई गाजरे,जया राव, अनुपमा पाटील, नरेंद्र पाटील,मंजूषा बुरजवाल, सुभाष मोहन दास,व इतर कवी कवयित्री आणि रसिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## जोगेश्वरीत रामनवमीचा उत्साह




गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी जोगेश्वरी पूर्व येथील सिद्धिविनायक मंदिरात रामनवमी निमित्त राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला यावेळी विष्णूसहस्र नाम, रामरक्षा रामनामाचा जप झाला..महाराज भुवन येथील राममंदिरात संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या जोगेश्वरी शाखेच्या वतीने रामजन्म, हनुमान चालिसा, रामरक्षा म्हणण्यात आज.यात महिलांचा सहभाग उत्स्फूर्त होता. साई मंदिर समिती जोगेश्वरी चे तर्फे सत्यनारायण पूजा, साईंचा महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.जयकोच टेम्पो असोसिएशनच्या वतीने सत्यनारायण आणि सुस्वर संगीतमय भजन झाले तर अस्मिता भवन येथे पद्मश्री रमेश पतंगे लिखित हम संघ में क्यूँ है...पुस्तकाचे प्रकाशन विठ्ठल कांबळे,चंद्रशेखर पारखी, रवी नथानी यांच्या हस्ते करण्यात आले.

# भारतीयांच्या खिशावर पहिला सर्जिकल स्ट्राईक पेट्रोल आणि डिझेल दोन रुपयांनी महागणार!

नवी दिल्ली : मोदी सरकारने देशातील पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ केली आहे.त्यामुळे जागतिक अस्थितरतेचा पहिला सर्जिकल स्ट्र ाईक पहिल्यांदा सर्वसामान्य भारतीयांच्या खिशावर झाला आहे. हा निर्णय महसूल संकलन वाढवण्यासाठी आणि अर्थसंकल्पीय तूट नियंत्रित करण्यासाठी केंद्र सरकारच्या धोरणाचा भाग मानला जात आहे. वाढीव उत्पादन शुल्क लागू होताच, तेल कंपन्या ते ग्राहकांना देऊ शकतात, ज्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये लवकरच वाढ होऊ शकते. सध्या कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीत अस्थिरता आहे. अशा परिस्थितीत हे



पाऊल सामान्य माणसांच्या, विशेषतः दररोज वाहनाने प्रवास करणाऱ्या किंवा वाहतूक क्षेत्राशी संबंधित असलेल्यांच्या खिशावर अतिरिक्त भार टाकू शकते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती स्थिर राहिल्या तर त्याचा परिणाम मर्यादित राहू शकतो, मात्र किमती वाढल्या तर महागाईवरही परिणाम होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे मत आहे.या आधारे देशभरातील पेट्रोल आणि डिझेलचे दर ठरविले जातात. मात्र, दीर्घकाळापासून राष्ट्र ीय स्तरावर तेलाच्या दरात कोणताही बदल झालेला नाही आणि भविष्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत ६५ डॉलरच्या खाली गेली आहे. ब्रेंट क्रूड



आज प्रति बॅरल ६४.०५ वर व्यापार करत आहे, तर थढख क्रू ड प्रति बॅरल ६०.५७ वर व्यापार करत आहे. जर आपण भारताबद्दल बोललो तर सरकारी तेल कंपन्यांनी आज (सोमवार), ०७ एप्रिल २०२५ रोजीही सर्व महानगरांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर ठेवल्या आहेत.देशाची राजधानी नवी दिल्लीत आज डिझेलचा दर ८७.६२ रुपये आहे. त्याचवेळी मुंबईत डिझेलचा दर ९२.१५ रुपये आहे. कोलकात्यात डिझेलची किंमत ९०.७६ रुपये प्रति लिटर आणि चेन्नईमध्ये डिझेलची किंमत ९२.३४ रुपये प्रति लिटर आहे. भारतातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किमतींवर आधारित असतात. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींचा आढावा घेतल्यानंतर भारतीय तेल विपणन कंपन्या दररोज पेट्रोल आणि डिझेलचे दर ठरवतात. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम तेल कंपन्या दररोज सकाळी ६ वेगवेगळ्या शहरांतील पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींची माहिती अपडेट करतात

## साहित्यिक हा समाज जीवनाचा आरसा : डॉ. संदीप सांगळे

ता.०२ ( पुणे प्रतिनिधी )

कवी, लेखक जेव्हा अस्वस्थ होतो तेव्हा त्याच्या लिखाणातून समाजाचे दुःख, वेदना व्यक्त होत असतात. त्यामुळे साहित्यिकांनी अस्वस्थ झाले पाहिजे तरच सकस साहित्याची निर्मिती होईल. कवी लेखक यांचे सामाजिक परिवर्तनात मोठे योगदान असून साहित्यिक हा समाज जीवनाचा आरसा आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शिरूर ग्रामीणच्या वतीने रांजणगाव गणपती येथे उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार सोहळा मोठया उत्साहात पार पडला. महाराष्ट्र राज्यातील एकूण दहा उत्कृष्ट साहित्यिकांचा सन्मान सावित्रीबाई फ ुले पुणे विद्यापीठाचे मराठी अभ्यास



ओळ : लेखक व कवी यांना मार्गदर्शन करताना डॉ. संदीप सांगळे.

साहित्य म्हणजे मानवी मनाचा तळ. तो आपल्याला गाठता आला पाहिजे. लेखकांनी मुळाशी जाऊन काम केले पाहिजे, म्हणजे दर्जेदार साहित्याची निर्मिती होईल. साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी ठेवून लेखन केले तरच समाजाचा विकास होईल.
- डॉ. संदीप सांगळे
-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष

मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यामध्ये दिपक तांबोळी, लक्ष्मण दिवटे, दत्ता पाटील, कमलाकर राऊत, बाळकृष्ण बाचल, उत्तम सदाकाळ, गणेश भाकरे, प्रकाश बोधे,सुभा लोंढे, अलकनंदा घुगे, इत्यादी लेखकांचा सन्मान चिन्ह,रोख रक्कम,व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शिरूर तालुक्यातील पाच साहित्यिकांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला.

यामध्ये, संभाजी शिवलें, शंकर न-हे, दत्तात्रय जगताप, दादाभाऊ गावडे, रुपाली भोरकडे या पाच साहित्यिकांना गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मांडवगण फराटा येथील प्रसिद्ध कावीळ तज्ञ डॉ.धनंजय शिंदे होते. तर ज्येष्ठ प्रबोधनकार उत्तम आण्णा भोंडवे व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे म राठी अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे हे उपस्थित होते.

ग्रंथ पुजनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे शिरुर ग्रामीणचे अध्यक्ष मनोहर परदेशी यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.कुंडलिक कदम यांनी केले. यावेळी मयुर करंजे, नानासाहेब गावडे, राहुल चातुर, सचिन बेंडभर,आकाश भोरडे, संभाजी चौधरी,बाबा इनामदार, गुरुनाथ पाटील, विठ्ठल वळसे, शेखर फराटे, बाळासाहेब फराटे, पांडुरंग बाणखिले, डॉ हेमंत दातखिळे, प्राचार्य जगदाळे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.विवेकानंद फंड यांनी सर्वांचे आभार मानले.

## पुस्तक रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

साहित्यसंपदा प्रकाशित 'शब्द माझे तुझ्याचसाठी' या कवयित्री सौ.अश्विनी सचिन बोलके यांच्या स्वरचित काव्यसंग्रहाला समाजसेविका - गझलकारा माननीय ममता सिंधुताई सपकाळ तसेच ज्येष्ठ गझलकार ऐ.के.शेख यांच्या हस्ते 'पुस्तक रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन केंद्र,पुणे येथे 'अश्रूंचे नंदनवन' हे 'साहित्य यज्ञ हेच आमचे ध्येय' असे ब्रीदवाक्य असलेल्या शुभंकरोती साहित्य परिवाराचे तिसरे राज्यस्तरीय संमेलन यशस्वीरीत्या पार पडले.यामध्ये विविध पुरस्कार,परिसंवाद,मुलाखत, काव्यस्पर्धा असे कार्यक्रम आखले गेले होते.समूह संस्थापिका सौ. सोनाली जगताप, प्रशासिका डॉ.माया यावलकर,साहित्यसंपदा संस्थापक श्री.वैभव धनावडे,अध्यक्ष ऐ.के. शेख,प्रमुख अतिथी ममता सपकाळ तसेच अनेक दिग्गजांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

## शिक्षिका कल्पना शहा सेवा निवृत्त

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

अंधेरी एम एम एम गर्ल्स हायस्कूल येथील शिक्षिका आणि सध्या १६६ अंधेरी पूर्व विधानसभा मतदार संघ कार्यालयात पर्यवेक्षक म्हणून काम पाहणाऱ्या कल्पना शहा नुकत्याच ३१ मार्च रोजी सेवा निवृत्त झाल्या.दिनांक ७ एप्रिल रोजी जोगेश्वरी स्थित इस्माईल युसुफ कॉलेज आवारातील मतदार संघ कार्यालयात त्यांच्या सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी कल्पना यांच्या पतीबरोबर कुटुंबातील इतर अनेकजण त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आले होते.कार्यालयातील मा. मतदार नोंदणी अधिकारी मा. प्रशाली दिघावकर व सहा. मतदार नोंदणी अधिकारी डॉ. नंदकिशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी राजेश खरात, सतीश मिठबावकर, अविनाश राठोड, रवींद्र गोसावी यांनी नायब तहसीलदार नरेश जागकर यांच्या पुढाकाराने आजच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. यावेळी कल्पना यांच्या अनेक सहकाऱ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत विचारातून आणि कविता गाणी गाऊन त्यांना भेटवस्तू आणि निवडणूक ऑफिसकडून सन्मानचिन्ह देऊन शुभेच्छा दिल्या.एक कर्तव्यदक्ष,मनमिळावू, प्रेमळ आणि विद्यार्थीप्रिय शिक्षिका असा त्यांचा नावलौकिक आहे.यावेळी जॉय ऑफ गिविंग संस्थेचे अध्यक्ष गणेश हिरवे यांनी त्यांना मेडल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा खास गौरव केला.कार्यक्रमाची सांगता सुग्रास भोजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान वेळीस यांनी केलं.गळे.

## मैत्रेय संघ ग्लोबलतर्फे संघदान आणि सन्मान सोहळा उत्साहात साजरा !!

नुकताच चेंबूर येथे मैत्रेय संघ ग्लोबल या बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही संघदान व सन्मान सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. वृद्ध व आजारी भिक्खू-भिक्खुनींसाठी संघदान करण्याचा संस्थेचा मुख्य उद्देश असून, यावर्षीचा कार्यक्रमही अत्यंत प्रेरणादायी ठरला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध उद्योजक संदीप मोरे, संगीती फाउंडेशनचे सर्वेसर्वा व ख्यातनाम धम्मसेवक वैभव सोनावणे, ललिता सोनवणे (सिनियर मॅनेजर - स्टार हेल्थ इन्शुरन्स) तसेच आदर्श उपासिका, विचारवंत आनंद मस्के, संजय चव्हाण आणि साहित्यिक व कवी विलास देवळेकर ह्या मान्यवरांच्या हस्ते दीप



प्रज्वलन करण्यात आले. तसेच भिक्खुनी महाथेरी रुपानंदा व माताजी धम्मदर्शनी यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. विचार मंचावरील मान्यवरांचे मपुष्पगुच्छफ देऊन स्वागत करण्यात आले. काही मान्यवरांनी आपल्या भाषणात भावना व्यक्त केल्या. आणि प्रसिद्ध कवी विलास देवळेकर यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर इको साऊंड सिस्टीम मध्ये म्युझिकल कविता सादर केली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात आनंद व्यक्त केले.

संघदानासोबतच समाजासाठी निः स्वार्थी सेवा करणाऱ्या व्यक्तींना ङ्गधम्म सेवक पुरस्कारङ्ग देऊन गौरविण्यात आले. जगभरात धम्म प्रचार करणारे बोधिसेन जी, तसेच सर्जेराव कांबळे व उषा ज्ञानदेव कांबळे यांना ङ्गजीवन गौरव पुरस्कारङ्ग प्रदान करण्यात आले. धम्मसेवक पुरस्कार प्राप्त व्यक्ती आदरणीय विष्णू खरे, विशाखा ढगे ताई, कविता शिकतोडे ताई, धनंजय शिराळ, मिलिंद जगताप, सत्यजित अहिरे, प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर विनीत कदम आणि प्रसिद्ध यूट्युबर प्रफुल वर्धमान. याशिवाय, शिवाजी साळवे व कुटुंबीयांचा ङ्गआदर्श बौद्ध कुटुंबङ्ग म्हणून विशेष सन्मान करण्यात आले. सर्व पुरस्कारार्थींना शाल घालून, पुष्पगुच्छ देऊन, आणि स्मृतिचिन्ह देऊन मसत्कारफ करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आदरणीय वसंतराव लोखंडे यांनी भूषवले, तर कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन बाळकृष्ण तांबे (नालंदा क्लासेस) यांनी केले. सर्व उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले.
कार्यक्रमाचे व्यवस्थापन
मैत्रेय संघ युवा टीम- दीपाली डोळस, रोहन साळवे, प्रज्ञा रणदिवे, प्रतीक अहिरे, सुनीता अहिरे, करण साळवे, पल्लवी सुरवडे आणि बाळू रणदिवे यांनी परिश्रमपूर्वक आयोजनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचा समारोप व आभार प्रदर्शन बुद्ध प्रिया रणदिवे यांनी केले..

# उज्जैनकर फाउंडेशनची झूम मीटिंग उत्साहात संपन्न प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांचा अभिनंदनचा ठराव सर्वानुमते मंजूर

बीड/प्रतिनिधी

उज्जैनकर फाउंडेशनची झूम मीटिंग उत्साहात संपन्न

प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांचा अभिनंदनचा ठराव सर्वानुमते मंजूर

शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगावची झूम मीटिंग नुकतीच संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 6 एप्रिल 2025 वार रविवार ला संध्याकाळी आठ ते दहा या वेळात उत्साहात संपन्न झाली या प्रसंगी फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव गणेश कोळी यांनी ठराव मांडलेत आळंदी संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा फाउंडेशनचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ हे एमआयटीचे संत ज्ञानेश्वर बी.एड. कॉलेज देहू रोड आळंदी या ठिकाणी गेल्या दहा वर्षापासून सक्षम प्राचार्य म्हणून कार्यरत होते परंतु त्यांचे नुकतीच कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च शासकीय अनुदानित महाविद्यालय, परळ मुंबई येथे नियुक्ती झाली त्याबद्दल त्यांचा अभिनंदनचा ठराव मांडण्यात आला यात्प्रसंगी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांचे टाळ्या वाजवून अभिनंदन केले व सर्वांनी दोन तास या विषयावर आपले विचार मांडलेत डॉ. सुरेंद्र हेरकळ यांच्या कल्पनेतून आळंदी संमेलनात आदिशक्ती संत मुक्ताई कडून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांना 750 फूट लांब व 75 किलो जाड वजनाची राखी तयार करण्यात आली व ही राखी 4 जानेवारी 2025 वार शनिवार रोजी सकाळी ठीक 8.00 वाजता संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींना अर्पण करण्यात आली व त्यानंतर या संमेलनाच्या ग्रंथदिंडीस प्रारंभ करण्यात आला याप्रसंगी उज्जैनकर फाउंडेशनचे महाराष्ट्रातील व आळंदी येथील विद्यार्थी ,गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते ही राखी गिनीज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आली त्याबद्दल सर्वांनीच डॉ.सुरेंद्र हेरकळ यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन केले प्रसंगी डॉ.शिवचरण उज्जैनकर यांनी डॉ. हेरकळ म्हणजे आपल्या उज्जैनकर फाउंडेशनला मिळालेला कोहिनूर हिरा आहे त्याचं कार्य लाख मोलाची आहे ते मुंबईला असल्याने पुढील आपले तिसरे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन ऑगस्टमध्ये आयोजित असल्याने या ठिकाणी सुद्धा डॉ. हेरकळ हे आपल्याला मदत करतील, सहकार्य करतीलच असे सुद्धा ते या प्रसंगी म्हणाले याप्रसंगी डॉ. सुरेंद्र हेरकळ म्हणाले की मी गेल्या वर्षी डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या उपस्थितीत उज्जैनकर फाउंडेशनच्या आळंदी येथील संमेलनाच्या मीटिंगमध्ये सहभागी झालो आणि तेव्हापासून माऊलींची सेवा माझ्या हातून घडत आहे आणि अखंड घडत राहील आपले फाउंडेशन म्हणजे एक फार मोठा परिवार असून या फाउंडेशन मधील सर्व पदाधिकारी तोलामोलाचे आहेत असेही ते याप्रसंगी म्हणाले उपस्थित सर्व मान्यवर पदाधिकाऱ्यांनी डॉ. सुरेंद्र हेरकळ यांना भविष्य काळातील शुभेच्छा देऊन त्यांच्या हातून अधिक उत्तमोत्तम कार्य घडो त्यासाठी त्यांना उत्तम आयूरारोग्य लाभो अशी सुद्धा ईश्वरचरणी प्रार्थना केली याप्रसंगी मागील काही विषयावर चर्चा आणि पुढील विषयावर चर्चा करण्यात येऊन त्यानंतर शंका, समाधान व सूचना आदि विषयावर सर्वानुमते चर्चा करण्यात आली. याप्रसंगी शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ शिवचरण उज्जैनकर राज्य अध्यक्ष छत्रपती संभाजी नगर येथील डॉ.सुभाष बागल राज्य सचिव छत्रपती संभाजीनगर येथील एडवोकेट सर्जेराव साळवे राज्य संपर्कप्रमुख अकोला येथील डॉ. अशोक शिरसाठ राज्य सल्लागार अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक तुळशीराम बोबडे राज्य संघटक पुणे येथील डॉ. निशीकांत धुमाळ राज्य खजिनदार साखरखेर्डा येथील कवी रामदास कोरडे अमरावती येथील निवृत्त तहसीलदार संजय ठोसर साहेब बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार आणि खामगाव येथील शंकरराव अनासुने बुलढाणा जिल्हा समन्वयक खामगाव येथील बाळूभाऊ ईटणारे बुलढाणा जिल्हा कोषाध्यक्ष खामगाव येथील शालिग्राम मानकर बुलढाणा जिल्हा सदस्य चिखली येथील भगवान पाटील आळंदी येथील संमेलनात फाउंडेशनचा आदिशक्ती संत मुक्ताई अध्यात्म सेवा पुरस्कार प्राप्त ह. भ. प. दलसिंग सुरडकर महाराज जळगाव जिल्हा अध्यक्ष किशोर पाटील उपाध्यक्ष मधुकर पोतदार साहेब जिल्हा संघटक भुसावळ येथील ज्ञानदेव इंगळे पुणे जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ बुडुखले गुरुजी पश्चिम महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष सांगली येथील सौ. मेघाताई पाटील पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव पुणे येथील रामचंद्र गुरव पश्चिम महाराष्ट्र विभागीय संघटक बार्शी सोलापूर येथील कवी अशोक मोहिते शेवटी उज्जैनकर फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव गणेश कोळी यांनी या सभेचे आभार प्रदर्शन केले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com